अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# भारतीयांच्या सवयींवर सिंगापूरकरांचे बोट

काही वर्षांपूर्वी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी भारतीय लोक खादाड असल्याचे म्हटले होते. अमेरिकन लोकांपेक्षा भारतीयांना वेगवेगळे पदार्थ खाण्याची सवय आहे. याहीपेक्षा गरज नसताना किंवा भूक नसतानाही दिसला पदार्थ की तो खाण्याची चटक भारतीयांना आहे ही गोष्ट मात्र खरी ठरली होती. बुश यांच्या या विधानाचा अनेक भारतीयांना राग आला होता. परंतु खरे सांगायचे तर भारतीय लोकांच्या अशा अनेक सवयी आहेत की, त्या कितीही कायदे नियम केले तरी बदलू शकत नाहीत. आता म्हणे सिंगापूरमधल्या वर्तमानपत्रामध्ये अशा जाहिराती येतात की, भारतीय आणि चीनी लोकांना भाड्याने घरे देऊ नयेत. 'नो इंडियन्स आणि नो चायनिज', असा स्पष्ट उल्लेख करून त्यांना भाड्याने घर देण्याचे टाळले जाते. याचे जे कारण पुढे आले आहे ते भलेही भारतीयांवर अन्याय करणारे असले तरी भारतीयांसाठी एक धडा घालून देणारे आहे यात काही शंका नाही. सिंगापूरच्या नागरिकांनी भारतीयांबरोबर चिनी लोकांनाही भाड्याने घर द्यायला याच कारणासाठी विरोध दर्शविला हे विशेष म्हणावे लागेल. अनेक बाबतीत चीन भारतापेक्षा पुढे आहे. त्याची आणि आपली बरोबरी होऊ शकत नाही असे आपणच नेहमी म्हणत असतो. परंतु भारतीय आणि चिनी लोक त्यांना दिलेल्या घरांचा आणि जागेचा योग्य रखरखाव ठेवत नाहीत. भारतीय लोक इतके मसालेदार आणि तेलकट पदार्थ खातात की, त्याच्या वासाने सिंगापूरकरांच्या नाका-तोंडातून पाणी यायला लागते. म्हणजेच स्वच्छता बाळगत नाहीत अशी सिंगापूरकरांची चिनी आणि भारतीय लोकांविषयीची तक्रार आहे. थोडक्यात सांगायचे तर अस्वच्छता आणि बेशिस्तपणा, तसेच खादाडपणा याबाबतीत सिंगापूरकरांनी चिनी आणि भारतीय लोक समान असल्याचे दाखवून दिले ही गोष्ट अनेक भारतीयांचा स्वाभिमान दुखावणारी ठरू शकेल. सिंगापूरचे लोक स्वत:ला फार पुढारलेले समजतात की काय आणि आम्ही भारतीय इतके मागासलेले आहोत की काय, अशी खंत निर्माण होऊ शकते. परंतु या निमित्ताने भारतीयांच्या काही चुकीच्या सवयींबाबत परस्पर कान टोचले जात असतील तर ते लक्षात घेतले पाहिजे.

## मुंबईचे सिंगापूर कसे होणार?

अनेक वेळेला भारतीय लोक परदेशात जातात आणि तिथल्या टापटिपणाचे स्वच्छतेचे तोंड फाटेस्तोवर कौतुक करीत राहतात. इथे येऊन आपला देश कसा गचाळ आहे. आपल्या इथे कशी अस्वच्छता आणि बेशिस्तपणा आहे याच्या तक्रारी करत राहतात. भारतातील सरकारी अधिकारी लाचखोर असल्याचे सांगताना तेच कसा कायदा धाब्यावर बसवितात याचेही वर्णन परदेश फिरून आलेले अनेक भारतीय करतात. परंतु आपल्या देशात आल्यावर ते स्वत: इतक्या बेशिस्तपणे वागतात की, त्याचे त्यांनाही भान राहत नाही. आपल्या देशातील अनेकांची अशी प्रवृत्ती झाली आहे की, दुसरे ते चांगले आणि आपले ते खराब अशीच तक्रार ते नेहमी करतात.परंतु अन्य देशांमधले लोक कठोरपणे कायदा पाळत असतात. रहदारीचे नियम मोडत नाहीत, अस्वच्छता होईल अशाप्रकारचे वर्तन करीत नाहीत. या गोष्टी माहीत असूनही भारतीय लोक त्याकडे दुर्लक्ष करतात आणि परदेशातल्या शिस्तीचे कौतुक करतात. आता जर सिंगापूरमधल्या नागरिकांनी त्या शिस्तीला धरूनच भारतीय लोकांच्या सवयींवर बोट ठेवले असेल तर ते आपल्याला समजून घ्यावे लागेल. या सवयी कितपत चांगल्या आहेत याचा विचार करावा लागेल. तिथल्या समाजजीवनाच्या शिस्तीचा भंग करीत नाही ना, हेदेखील पाहावे लागेल. किंवा भारतात राहणारे सिंगापूरचे लोक अशा प्रकारेच भारतात वागतात का, याचाही अभ्यास करावा लागेल. तर त्यांनी दिलेल्या या जाहिरातींमध्ये भारतीयांच्या तेलकट पदार्थ खाण्याच्या सवयीला किंवा घर प्रॉपर्टी काटेकोरपणे सांभाळण्याच्या प्रवृत्तीला विरोध झाला असेल तर तो भारतीयांच्या फायद्याचा आहे किंवा नाही हे मनमोकळेपणाने आपण तपासले पाहिजे. आपण मुंबईचे सिंगापूर करायला निघालो होतो. परंतु मुंबईकरांनासुध्दा अनेक चुकीच्या सवयी आहेत. प्रामुख्याने स्वच्छतेच्या बाबतीत मुंबई अजूनही सिंगापूरच्या मागे आहे. जर आपल्याला मुंबई सिंगापूरसारखी करायची असेल तर पहिल्यांदा इथल्या सरकारला कायद्याची अंमलबजावणी करावी लागेल. लाचखोरी थांबवावी लागेल. नागरिकांनाही इथे तिथे घाण करण्याची सवय सोडून द्यावी लागेल. या साध्या-साध्या गोष्टी केल्या तरी मुंबईचे सिंगापूर व्हायला वेळ लागणार नाही.

## चांगल्या सवयी आवश्यक

माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम हेदेखील राष्ट्रपती असताना सिंगापूरला गेले होते. त्यावेळेला त्यांनी तिथल्या शिस्तीचे तोंड भरून कौतुक केले होते. कुणीही रस्त्यावर थुंकत नाही. कागदाचे तुकडे किंवा सिगारेटची थोटके रस्त्यावर फेकत नाही. रहदारीचे नियम काटेकोरपणे पाळतात. या त्यांच्या सवयी भारतीयांनासुध्दा शिकण्यासारख्या आहेत, असे कलाम यांनी म्हटले होते. असे जर असेल तर जॉर्ज बुश यांनी भारतीयांना खादाड म्हणण्याचा राग न मानता किंवा सिंगापूरकरांनी घर भाडयाने देताना भारतीयांकडून स्वच्छतेच्या अपेक्षा ठेवल्या असतील तर त्याबाबत संताप न करता त्या स्वीकारण्याची तयारी ठेवली पाहिजे. एवढेच नव्हे तर आपल्या देशातसुध्दा सिंगापूर, अमेरिका, फ्रॅन्सप्रमाणे कसे कायदे पाळू शकतो आणि स्वच्छता ठेवू शकतो हे दाखवून दिले पाहिजे. केवळ सिंगापूरच्या पेपरमध्ये जाहिराती आल्या म्हणजे भारतीय आणि चिनी लोकांना तिथे घर मिळणार नाही, असे समजण्याचे कारण नाही. त्या जाहिरातीमागे असलेली तक्रार लक्षात घेतली पाहिजे. जर चुकीच्या सवयींबाबत भारतीयांचे सिंगापूरकरांनी कान टोचले असतील तर चुकीच्या सवयी आपल्याकडून होणार नाहीत याबाबत तिथे राहणाऱ्यांनी कानाला खडा लावला पाहिजे.